# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 25 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २५ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- देशवासियांनी गुणवत्ता वाढीवर भर देण्याच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मनकी बातमध्ये आवाहन
- अर्मिडा फर्नांडीस यांना वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आणि भिकल्या लाडक्या धिंडा यांना कलाक्षेत्रासाठी पद्मश्री पुरस्कार
- सोळावा राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा

आणि

- महाराष्ट्राच्या ८९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शौर्य, सेवा पदकं

****

आपण वाढदिवस साजरा करतो, त्याचप्रमाणं जेव्हा एखादा युवक किंवा युवती पहिल्यांदाच मतदार होतात तेव्हा तो दिवस देखील साजरा करायला पाहिजे, त्यामुळं मतदारांमध्ये जागृती होईल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवरच्या आपल्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. या मालिकेतला हा १३० वा आणि या वर्षाचा पहिला भाग होता. आपल्या भाषणात पंतप्रधानांनी देशवासियांना प्रजासत्ताक दिन आणि आज साजरा होत असलेल्या राष्ट्रीय मतदार दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. मतदार हा लोकशाहीचा आत्मा असल्याचंही मोदी यावेळी म्हणाले. यावर्षी सर्व ताकदीनिशी गुणवत्तेला प्राधान्य देऊ या, असं मोदी यांनी नमूद केलं.

ते म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

गुणवत्तेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. शून्य दोष – शून्य परिणाम असं केल्यानंच आपण विकसित देशाचा प्रवास वेगानं पुढे नेऊ शकू असं ते म्हणाले. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात पर्यावरण,स्वच्छता,नदी स्वच्छता याविषयी देशसहभागातून केल्या जाणाऱ्या कामांची प्रशंसा केली. 'जेन झी' अर्थात नव्या पिढीमध्ये भक्ती आणि अध्यात्माविषयी आवड निर्माण होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. देशाबाहेर असलेले भारतीय, देशाबाहेरही आपल्या संस्कृती आणि परंपरांचं जतन करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. मलेशियामधल्या भारतीयांचा पंतप्रधानांनी त्यासाठी विशेष उल्लेख केला. 'मन की बात' कार्यक्रमाच्या माध्यमातून देशाची उल्लेखनीय कामगिरी जाणून घेण्याची आणि ती साजरी करण्याची संधी मिळते असंही पंतप्रधानांनी सांगितलं.

****

राज्यातल्या अर्मिडा फर्नांडीस यांना वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आणि भिकल्या लाडक्या धिंडा यांना कलाक्षेत्रासाठी पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती अधिकृत सुत्रांनी दिली आहे. फर्नांडीस यांनी आशियातली पहिली मानवी दूधबँक सुरू केली. त्यांनी नवजात मृत्यूदर ७० टक्क्यांवरून १२ टक्क्यांपर्यंत कम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. धिंडा यांनी दुर्मिळ असलेल्या तारपा या संगीत परंपरेच जतन केलं असल्याबद्दल त्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाली आहे.

****

देशभरात आज १६ वा राष्ट्रीय मतदार दिन साजरा होत आहे. भारतीय लोकशाहीत नागरिकांची मध्यवर्ती भूमिका ठळकपणे मांडणारी माझा भारत, माझं मतदान ही यंदाची संकल्पना आहे. भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. मतदारांचं महत्त्व अधोरेखित करणं, निवडणूकांविषयी जनजागृती वाढवणं आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित करणं हा या दिनाचा उद्देश आहे. या निमित्त नवी दिल्ली इथं झालेल्या राष्ट्रीय कार्यक्रमाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संबोधित केलं. मतदार ओळखपत्रामुळं मतदारांना जगातल्या सगळ्यात मोठ्या लोकशाहीत सक्रिय भागिदार होण्याचा अधिकार मिळतो असं त्यांनी सांगितलं. त्या म्हणाल्या –

**बाईट – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

मताधिकाराचा हक्क बजावणं हे राजकीय जागृतीचं माध्यम असल्याचं बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, याचं स्मरण राष्ट्रपतींनी करून दिलं. मतदानाच्या अधिकारासोबतच, प्रत्यक्ष मतदान करणंही तितकंच महत्वाचं असतं असं त्यांनी सांगितलं. देशाचे मतदार प्रलोभन, खोटी माहिती तसंच दुष्प्रचाराला बळी न पडता आपल्या विवेकबुद्धीनं देशाच्या निवडणूक व्यवस्थेला सुदृढ बनवतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. निवडणूक आयोगाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळं देशाच्या लोकशाहीच्या प्रतिष्ठेत सातत्यानं भर पडत राहील असं त्या म्हणाल्या. यावेळी राष्ट्रपतींनी निवडणूक प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर, मतदार जागृती, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी अशा विविध श्रेणींमधे पुरस्कार प्रदान केले. यात मतदारांच्या जागृतीसाठी उत्कृष्ट मोहीम राबवल्याबद्दल आकाशवाणी वृत्तविभागाला इलेक्ट्रॉनिक रेडिओ श्रेणीत पुरस्कार देण्यात आला. आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन यांनी हा पुरस्कार स्वीकारला. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी जबाबदार आणि जागरूक मतदानातून लोकशाही अधिक बळकट करण्याचं आवाहन केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, मनसुख मांडवीय यांनीही मतदार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

बीड इथं जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम झाला. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त नाशिकमध्ये आज सकाळी काढण्यात आलेल्या सायकल फेरीत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम आणि जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सहभाग घेतला.

****

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, आज संध्याकाळी ७ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार आहेत. त्यामुळं आकाशवाणी मुंबई केंद्रावरून रोज संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज ६ वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होईल.

****

देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशातील पोलीस, अग्निशमन, होमगार्ड आणि सुधारात्मक सेवेतील एकूण ९८२ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. यात महाराष्ट्रातील एकूण ८९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. ३१ पोलीस कर्मचाऱ्यांना ‘वीरता पदक’,

उत्कृष्ट आणि विशिष्ट सेवेसाठी दिला जाणारे 'राष्ट्रपती पदक', पोलीस दलातील चार अधिकारी आणि सुधारात्मक सेवा विभागातील २ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. उल्लेखनीय सेवेसाठी महाराष्ट्रातील पोलिस सेवेतील ४०, अग्निशमन सेवेसाठी ४, नागरी संरक्षण गृहरक्षक सेवेतील ३, सुधारात्मक सेवेतील ५ कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृहमंत्रालया मार्फत दरवर्षी पोलीस, अग्निशमन, गृहरक्षक दल आणि सुधारात्मक सेवेतील कार्यासाठी शौर्य आणि सेवा पदके जाहीर केले जातात.

****

कर्तव्यावर असताना मद्यपान करणारे एसटीचे चालक आणि इतर कर्मचाऱ्यांना तातडीनं निलंबित करावं, असे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज दिले. मुंबईतल्या परळ स्थानकाला आज भेट देऊन त्यांनी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांची पाहणी केली. यावेळी अनेक ठिकाणी मद्याच्या रिकाम्या बाटल्या आढळल्या, तसंच काही कर्मचाऱ्यांकडून मद्याचा दुर्गंध आल्याचं निदर्शनाला आल्यामुळे सरनाईक यांनी तिथं उपस्थित असलेल्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना धारेवर धरलं आणि संबंधितांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करायचे निर्देश दिले.

****

नांदेडमध्ये होत असलेल्या श्री गुरु तेग बहादुर साहीबजी यांच्या ३५० व्या हौतात्म्य वर्षानिमित्त "हिंद दी चादर" कार्यक्रम आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होत आहे. आज मुख्यमंत्र्यांनी तख्त सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिबजी गुरुद्वाराचं दर्शन घेतलं. यावेळी त्यांच्यासह आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण, महाराष्ट्र राज्याचे बहुजन कल्याण मंत्री तथा नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, खासदार अशोक चव्हाण यांच्यासह अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य चरणदीप सिंघ उपस्थित होते.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना आज गुवाहाटी इथं संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल. भारतीय संघाने आधीचे दोन्ही सामने जिंकले आहेत.

****